दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड महाराष्ट्र | सोमवार, 20 जुलै 2026 | अंक क्र. 75 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# सिरसाळ्यात रेशनच्या धान्याबाबत संताप; गोरगरिबांच्या ताटात 'निकृष्ट' दर्जाचा तांदूळ-गहू!

## अमच्या आरोग्याशी खेळ खेळला जातो ग्रामस्थांचा आरोप

■ सिरसाळा/अतुल बडे

एकिकडे शासन गोरगरिबांना पोटाला आधार मिळावा म्हणून स्वस्त दरात धान्य उपलब्ध करून देत असताना, दुसरीकडे सिरसाळा येथील स्वस्त धान्य दुकानांतून अत्यंत निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे संतप्त ग्रामस्थांनी या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार

सिरसाळा परिसरातील रेशन दुकानांमधून गेल्या काही दिवसांपासून लाभार्थ्यांना जो तांदूळ आणि गहू दिला जात आहे, तो खाण्यायोग्य नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. वाटप करण्यात येत असलेल्या तांदळामध्ये खडे, कचरा आणि काही ठिकाणी बुरशी लागलेले धान्य आढळून येत आहे. तर गव्हाचा दर्जाही अत्यंत खालच्या पातळीचा असून, त्यातून पिठही व्यवस्थित निघत नसल्याच्या तोंडी तक्रारी अमच्या प्रतिनिधीना लाभार्थ्यांनी केल्या आहेत.स्थानिक नागरिकांच्या मते, "आम्ही हक्काचे धान्य मागितले असता, दुकानदार उलट आम्हालाच दमदाटी करतात किंवा `आहे तेच घ्यावे लागेल' असे उत्तर देतात. आमच्या आरोग्याशी खेळ खेळला जात असून, या निकृष्ट अन्नामुळे मुलांच्या आणि वृद्धांच्या प्रकृतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. "स्वस्त धान्य दुकानात पोहोचणारे हे धान्य कोठून येते आणि त्याची गुणवत्ता तपासणी का केली जात नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. परिसरातील नागरिकांनी आता जिल्हा पुरवठा विभागाकडे धाव घेण्याचे ठरवले असून, संबंधित दुकानदारावर कारवाई करावी आणि धान्याचा दर्जा सुधारावा, अशी मागणी जोर धरत आहे.

**जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन सिरसाळा येथील रेशन दुकानांची आकस्मिक तपासणी करावी आणि लाभार्थ्यांना दर्जेदार धान्य मिळेल याची सुनिश्चिती करावी अशी मागणी नागरीकांतुन होत आहे**





## सिरसाळ्यात दोन दिवसीय 'इज्तेमा'चा आज होणार दुआ प्रार्थनाणे समारोप

■ सिरसाळा/अतुल बडे

येथील दोन दिवसीय 'इज्तेमा'ची आज दि. १९ जुलै २०२६ रविवार, विशेष दुआ आणि प्रार्थनेने सांगता होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी परळी तालुका व परिसरासह विविध भागांतून हजारो भाविकांनी सिरसाळ्यात मोठी गर्दी केली आहे. शनिवार दि. १८ जुलै पासून सुरू असलेल्या या इज्तेमामध्ये इस्लाम धर्माच्या तत्त्वांवर आधारित विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने प्रख्यात धर्मगुरूंनी मार्गदर्शन केले, तर प्रार्थना आणि समाजसुधारणेवर आधारित उपदेशांतून मानवी मूल्ये, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला. आज होणार असलेल्या मुख्य दुआ (प्रार्थना) साठी भाविकांच्या मोठ्या संख्येमुळे परिसरामध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, शांतता आणि शिस्तबद्ध पद्धतीने कार्यक्रम पार पाडण्यासाठी आयोजकांकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत.

# लिंबोटा गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा!

## नीट परीक्षेत घवघवीत यश मिळवलेल्या चि. बालाजी मुंडेचा गावकऱ्यांकडून गौरव



■ लिंबोटा: प्रतिनिधी

गावातील चि. बालाजी राजाभाऊ मुंडे याने नुकत्याच जाहीर झालेल्या 'नीट' (NEET) परीक्षेत ५८४ गुणांसह घवघवीत यश संपादन केले आहे. त्याच्या या नेत्रदीपक यशामुळे त्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात (Government Medical College) एमबीबीएस (MBBS) साठी प्रवेश मिळणार हे निश्चित झाले असून, त्याने गावाच्या नावाचा लौकिक वाढवला आहे. या अभूतपूर्व यशामुळे चि. बालाजी याच्यावर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे. या यशाचे औचित्य साधून लिंबोटा येथील 'मथुराई निवासस्थानी' त्याचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

सत्कार समारंभादरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बालाजीचा शाल, श्रीफळ देऊन यथोचित गौरव करण्यात आला. यावेळी बाजार समितीचे (मार्केट कमिटी) माजी संचालक श्री. सूर्यकांत मुंडे आणि ज्येष्ठ नागरिक प्रल्हाद मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सत्कार सोहळा पार पडला. एका ग्रामीण भागातील मुलाने जिद्दीच्या जोरावर वैद्यकीय क्षेत्रात घेतलेली ही झेप संपूर्ण गावाला अभिमान वाटावी अशीच आहे, अशा भावना मान्यवरांनी यावेळी व्यक्त केल्या. या सत्कार सोहळ्याला गावातील ज्येष्ठ व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. यामध्ये माजी सैनिक बिभीषण मुंडे विश्वनाथ आबा, विश्वनाथ मुंडे, भागवत मुंडे, वैजनाथ मुंडे, बाबुराव मुंडे, मंचक मुंडे, राजेभाऊ मुंडे, विष्णू मुंडे, नारायण दिवटे, पप्पू ढेकळे, गौतम बनसोडे, गणेश नागरगोजे, अशोक मुंडे अक्षय मुंडे, योगेश मुंडे, अक्षय मुंडे, रोहन मुंडे, उद्धव मुंडे, महादेव मुंडे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बालाजीच्या या यशामुळे लिंबोटा गावात आनंदाचे वातावरण असून, त्याच्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी संपूर्ण गावाने त्याला मनापासून शुभेच्छा दिल्या आहेत.

## मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये पुढील 3 तास मुसळधार पावसाचा इशारा; हवामान विभागाचा ऑरेंज अलर्ट

■ मुंबई : वृत्तसंस्था

भारतीय हवामान विभागाने ठाणे आणि पालघर जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. सोमवार, २० जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता जारी करण्यात आलेल्या नाऊकास्ट वॉर्निंगनुसार (Nowcast Warning), पुढील ३ तासांत काही ठिकाणी मध्यम ते अतिमुसळधार पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, हा इशारा दुपारी १ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा तसेच सखल भाग, पाणी साचणारे रस्ते आणि पूरप्रवण परिसरात विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मुंबई महानगर प्रदेशात जोरदार पावसामुळे काही ठिकाणी वाहतूक विस्कळीत होण्याची आणि पाणी साचण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहनचालकांनी सावधगिरी बाळगावी आणि हवामानाची ताजी माहिती लक्षात घेऊनच प्रवासाचे नियोजन करावे. भारताचा अनुभवी सलामीवीर रोहित शर्माने लॉर्ड्स मैदानावर इंग्लंडविरुद्ध शानदार शतक झळकावत पुन्हा एकदा आपल्या टीकाकारांना बॅटने उत्तर दिले. 388 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रोहितने दमदार फलंदाजी करत 110 चेंडूत 138 धावांची खेळी केली. या खेळीत त्याने 17 चौकार आणि 5 षटकार ठोकले.



## संपादकीय

# बैलाविना शेतीला मजा नाही!

रासायनिक खतांने पर्यावरणाचे जे नुकसान होत आहे, ते पाहता पुन्हा एकदा बैलांच्या शेतीकडे वळण्याची गरज अधोरेखित होत आहे. सेंद्रिय शेतीचा पाया बैलांच्या सान्निध्यात टिकून राहणाऱ्या नैसर्गिक चक्रावर अवलंबून आहे.

कष्टाशिवाय मातीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही या लोकप्रिय सुवचनेप्रमाणे मातीशी जोडलेला आणि बैलाच्या कष्टावर आधारित असलेला शेतीचा पाया कधीही बदलू शकत नाही. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे अगदी खरे आहे. शेती आणि बैल यांचे नाते अतूट आहे. सध्या सर्रास ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेती केली जात आहे; परंतु बैलांच्या सहाय्याने शेती केली जात होती त्यामध्ये खरी मजा असायची. शेतात मशागत करून चालणार नाही तर प्रत्यक्षात शेतात घाम गाळावा लागतो. शेतातील मातीशी एकरूप व्हायचे असेल तर बैलांच्या सहाय्याने नांगरणी केल्याने खऱ्या अर्थाने मातीशी एकरूप होता येते. यातूनच कष्टाचे महत्त्व समजते. त्यामुळे ट्रॅक्टरने शेती जरी केली तरी आजही आणि उद्या शेतीशी बैलांचे योगदान अबाधित राहणार आहे. हीच खरी आपल्या शेतीप्रधान देशातील शेतीची संस्कृती आहे. थंडी, ऊन आणि पाऊस यांची पर्वा न करता शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून कष्टाची कामे करीत असतात. त्यामुळे बैल हा शेतकऱ्यांचा कष्टाचा साथीदार झाला आहे. आतापर्यंत बैलांच्या सहाय्याने शेतातील नांगरणी, कोळपणी, गुटा, मळणी आणि बैलगाडीने सामानाची वाहतूक करणे अशी विविध अवघड कष्टाची कामे केली जात होती. काही ठिकाणी अजूनही केली जातात. मात्र त्याचे प्रमाण कमी होत आहे. म्हणजे त्यावेळी शेतकऱ्यांचा खरा आधार बैल होता.

शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतली तरी बैलांची जागा कोणीही घेऊ शकत नाही. शेवटी बैल हे बैल असतात. शेतीचा विचार करता शेताच्या मातीशी जुळलेली त्यांची नाळ आणि शेतकरी राजाचे भावनिक नाते कमी झालेले नाही. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एक प्रमुख घटक असतो. बैल हे शेतीपुरते मर्यादित नसून बैलांमुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे शेताच्या बांधावर गेल्यावर बैलांची आठवण येते. आपल्या राज्यात शेती क्षेत्रात बैलांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, उद्याही असणार आहे. शेतकरी बैलांच्या मदतीने शेतात काम करीत असताना माती आणि निसर्गाशी जिव्हाळा लागलेला आहे. नैसर्गिक संकटे आली तरी त्यांच्यामध्ये तडा गेलेला नाही किंवा जाणारही नाही. हा निसर्गाचा नियम आहे. शेतीची कामे झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी बैलांचे पूजन करतात. तसे दरवर्षी बैलपोळा सण शेतकऱ्यांच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी बैलांना पाण्याने धुतले जाते. त्यानंतर त्यांचे अंग टॉवेलने पुसले जाते. त्यांच्या शिंगांना शेतकरी आपल्या आवडीप्रमाणे रंग लावतात. गळ्यात रंगीबेरंगी फुलांची माळ घालण्यात येते. घरात गोडधोड जेवण केले जाते. गोठ्यात जाऊन त्यांच्या डोक्याला टिळा लावून त्यानंतर आरती ओवाळून त्यांचे पूजन केले जाते. पूजन झाल्यावर केळीच्या पानातून त्यांना सुद्धा जेवण दिले जाते. त्या दिवशी त्यांना गोठ्यातच आराम करण्यासाठी दाव्याने बांधून ठेवतात. वेळच्या वेळी चारा आणि पाणी दिले जाते. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, आपल्यापेक्षा मुक्या प्राण्यांना अधिक समजते. शेवटी काय मौनाची भाषा मौनालाच समजते.

शेतीच्या कामासाठी बैलांचा वापर केला गेल्याने जमिनीची नांगरणी करीत असताना जमिनीची धूप कमी होते. त्यांच्या पायांनी माती बारीक होते. चिखलही शेतीलायक होतो. शेणाचा उपयोगही सेंद्रिय खत म्हणून वापर केला जातो. यामुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते तसेच प्रदूषण कमी होण्याला मदत होते. शेती उत्पादनाचा विचार करता पारंपरिक पद्धतीने शेती करत असल्याने आधुनिक पद्धतीपेक्षा कमी उत्पादन होऊ शकते. मात्र शेतीचा कस टिकून राहतो. जरी शेती उत्पादन कमी झाले तरी बैलांमुळे आपण पर्यावरणपूरक शेती करू शकतो. यात मानवी श्रमाचा वापर केला जात असून नैसर्गिक बी-बियाण्यांचा अर्थात स्थानिक बियाण्यांचा व शेण खताचा वापर केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांचे हात-पाय सुद्धा सुरक्षित राहतात.

आता शेतीची कामे सुरू झालेली आहेत. शेतकरी जमिनीची नांगरणी ट्रॅक्टरने करू लागले आहेत. त्यामुळे शेतात शेतकऱ्यांचा आवाज एकदम बंद असल्याचा दिसतो. जेव्हा बैलांच्या सहाय्याने नांगरणी करीत होते तेव्हा जमीन नांगरताना शेतकरी ईरीरी..., पापारी... म्हणत असत. शेतकऱ्याच्या एका हातात रुमनी आणि एका हातात लिंगडीची काटी असायची. बैलांची नावे पण आकर्षक ठेवायची पाखऱ्या, पांढऱ्या, हौश्या, हरण्या, सोन्या, लाल्या अशी असायची. शेतकरी बैलाचे नाव घेऊन म्यार धर म्हटले की, तो आपोआप मेरे जवळ जायचा. त्यामुळे नांगरणी सुद्धा शेतीलायक व्हायची. कोपऱ्यात बैल उभे असले काय कोपरे फुलून दिसायचे. हीच खरी शेतकऱ्यांची शान आहे. आता जरी ट्रॅक्टरने शेती केली तरी बैलांशिवाय शेतीची कामे केली अशी वाटत नाहीत. तसेच बैलांच्या सहाय्याने नांगरणी केली जात होती त्यावेळी शेतकरी राजाला त्यात खरा आनंद मिळत होता. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे मात्र खरे आहे. आजचे कृषी जग हे यांत्रिकीकरणाच्या प्रभावाखाली असले तरी, बैलांच्या परंपरेत जपलेले ते सौंदर्य आणि तो जिव्हाळा यांत्रिक ट्रॅक्टरमध्ये कधीही सापडणार नाही. आधुनिकतेच्या रेट्यात आपण कदाचित वेगवान शेती करत असू, परंतु त्या वेगाच्या नादात आपण मातीचा पोत आणि बैलांशी असलेला भावनिक संवाद हरवून बसलो आहोत का, असा प्रश्न पडतो.

# स्पेनचा विश्वविजय! फुटबॉलमध्ये रचला ऐतिहासिक विक्रम; अशी कामगिरी करणारा जगातील पहिलाच संघ

**स्पेनने फिफा विश्वचषक 2026 चे विजेतेपद पटकावत जागतिक फुटबॉलमध्ये नवा इतिहास रचला आहे. अंतिम सामन्यात अर्जेंटिनाचा अतिरिक्त वेळेत 1-0 असा पराभव करत स्पेनने ( Spain) दुसऱ्यांदा विश्वविजेतेपदावर नाव कोरले. यापूर्वी स्पेनने 2010 मध्ये विश्वचषक जिंकला होता. या विजयामुळे गतविजेता अर्जेंटिनाचे सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. (FIFA World Cup 2026) अंतिम सामना (FIFA Final) अत्यंत चुरशीचा झाला. दोन्ही संघांनी निर्धारित वेळेत गोल करण्यासाठी अनेक प्रयत्न केले, मात्र बचावफळीच्या भक्कम खेळीमुळे गोल झाला नाही. अतिरिक्त वेळेत स्पेनचा बदली खेळाडू फेरान टोरेस याने 106 व्या मिनिटाला निर्णायक गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. हा गोल अखेर सामन्याचा निकाल ठरला.**



### स्पेनचा ऐतिहासिक विजय

एकाच वेळी पुरुष आणि महिला अशा दोन्ही फुटबॉल विश्वचषकांवर नाव कोरणारा स्पेन हा इतिहासातील एकमेव देश ठरला आहे. 2023 मध्ये सिडनी येथे झालेल्या महिला विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात स्पेनने इंग्लंडचा पराभव करत प्रथमच विजेतेपद पटकावले. याआधी स्पेनच्या पुरुष संघाने 2010 मध्ये फिफा विश्वचषक जिंकला होता. या ऐतिहासिक कामगिरीमुळे पुरुष आणि महिला दोन्ही विश्वचषक जिंकणारा स्पेन हा जगातील पहिलाच आणि एकमेव देश बनला.

### विश्वविजेतेपद स्पेनच्या नावावर; अर्जेंटिनाला १-० ने दिली मात!

न्यूयॉर्क: फुटबॉल विश्वाच्या महाकुंभाचा पडदा आज एका ऐतिहासिक क्षणासह पडला. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये पार पडलेल्या ४८ संघांच्या या सर्वात ...

संपूर्ण स्पर्धेत स्पेनने सातत्यपूर्ण कामगिरी केली. संघाने स्पर्धेदरम्यान केवळ एकच गोल स्वीकारला आणि अपराजित राहून विश्वविजेतेपद पटकावले. मिडफिल्डमध्ये रोड्रीने प्रभावी नियंत्रण ठेवले, तर गोलरक्षक उनाई सायमन याने अनेक महत्त्वाच्या बचावांमुळे संघाच्या यशात मोठा वाटा उचलला. आक्रमणात मिकेल ओयार्झाबालनेही सातत्यपूर्ण कामगिरी केली. 19 वर्षीय लॅमिन यामालसाठीही हा विजय विशेष ठरला. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीलाच त्याने विश्वविजेत्या संघाचा भाग बनण्याचा मान मिळवला. दुसरीकडे, लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिनाला अंतिम सामन्यात अपेक्षित कामगिरी करता आली नाही.

अर्जेंटिना विरुद्ध स्पेन महामुकाबला; जगाला मिळणार नवा विश्वविजेता! न्यूयॉर्क: फिफा विश्वचषक 2026 च्या अंतिम सामन्याची प्रतीक्षा अखेर संपली आहे. फुटबॉल विश्वातील दोन दिग्गज संघ, गतविजेता अर्जेंटिना आणि युरोपियन ...स्पेनने या स्पर्धेत गट फेरीपासून अंतिम सामन्यापर्यंत प्रभावी खेळ केला. बाद फेरीत त्यांनी मजबूत प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत अंतिम फेरी गाठली आणि अखेर विश्वचषक उंचावत जागतिक फुटबॉलमध्ये पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले. या विजयामुळे स्पेनचा आत्मविश्वास आणखी वाढला असून आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी संघाकडे प्रमुख दावेदार म्हणून पाहिले जात आहे.

# इंग्लंडला रोहित शर्मा फोडत होता

**मुंबई : वृत्तसंस्था**

रोहित शर्माने शतक आणि शुभमन गिल, विराट कोहली यांनी अर्धशतक ठोकले खरे; पण ते भारताच्या विजयासाठी पुरेसे ठरले नाही. इंग्लंडने मालिकेतील तिसऱ्या वन-डे क्रिकेट सामन्यात भारतावर २७धावांनी मात केली. यासह इंग्लंडने तीन सामन्यांची मालिका २-१ने जिंकली. भारत हरला पण रोहित शर्मा याच्या शतकाने सर्व चाहते खूष झाले. सर्वांना हिटमॅनचा शो पाहायला मिळाला. पण तुम्हाला माहिती का या सामन्यामध्ये रोहित शर्माने वापरलेली बॅट त्याची नव्हती. ही बॅट त्याला टीमबाहेर असलेल्या खेळाडूने दिली होती. नेमका कोण होता तो खेळाडू? ज्याने रोहितला बॅट दिली जाणून घ्या. रोहित शर्मा याने शतक केल्यावर त्यावेळी त्याने बॅट उंचावल्यावर बॅटच्या बॉटमला एका खेळाडूचे नाव लिहिल होते.

# श्रीक्षेत्र वृद्धेश्वर ते पंढरपूर पायी दिंडी : शिस्त, समर्पण आणि समतेचा लोकोत्तर सोहळा

## उंबरेकर महाराजांच्या मार्गदर्शनातून फुललेली भक्ती, सेवाभाव आणि सामाजिक एकात्मतेची अखंड परंपरा

**देऊळगाव.(आदिनाथ ठोंबरे)**



ह.भ.प.ब्र.मु. रघुनाथ महाराज उंबरेकर
श्री क्षेत्र वृध्देश्वर ता. पाथर्डी

गर्भागिरी परिसर म्हणजे जणू काय देवभूमीच. या परिसराला अध्यात्मिक कलाटणी देण्याचे काम ह. भ.प. रघुनाथ महाराज उंबरेकर यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या आशीर्वादाने या परीसराने एक मोठी अध्यात्मिक उंची गाठली. त्यांच्या आशीर्वादानेच गेल्या २५ वर्षापासून हरिभक्त परायण पंढरीनाथ महाराज उंबरेकर यांनी श्रीक्षेत्र ते पंढरपूर असा पायी दिंडी सोहळा सुरु केला. आजही तोच वसा आणि तोच वारसा हरिभक्त परायण भागवत महाराज उंबरेकर अतिशय चांगल्या प्रकारे चालवत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालील या पायी वारी सोहळ्यामध्ये देऊळगाव घाट, शेडाळा, घाटशिरस सह पाथर्डी, आष्टी, राहूरी, नगर नेवासा तालुक्यातील अनेक वारकरी मोठ्या भक्ती भावाने पंढरीची वाट चालतात. गर्भागिरी परिसराला एक चांगलं भक्ती व्यासपीठ या रूपाने मिळाले आहे.

हाआषाढी पायी दिडी सोहळा म्हणजे केवळ श्रीक्षेत्र वृद्धेश्वर ते श्रीक्षेत्र पंढरपूर या भौगोलिक अंतराची केलेली पायी परिक्रमा नाही, तर तो मानवी मनाच्या सीमा ओलांडून ईश्वराच्या सान्निध्यात पोहोचण्याचा एक अलौकिक आणि दिव्य प्रवास आहे. हा प्रवास म्हणजे श्रद्धेचे एक जिवंत महाकाव्य असून, यात भक्तीच्या प्रवाहाने समतेची किनार गाठली आहे. वारीच्या प्रत्येक पावलागणिक अहंकाराचे थर गळून पडतात आणि आत्मशोधाची एक नवी कवाडे उघडत जातात. टाळ-मृदंगाच्या गजरात, शिस्तीच्या चौकटीत आणि समर्पणाच्या भावनेत जेव्हा हा दिंडी सोहळा मार्गस्थ होतो, तेव्हा रस्ते केवळ मातीचे न राहता साक्षात भूवैकुंठाची वाट बनतात. ही दिंडी म्हणजे केवळ पंढरीची ओढ नसून, ती मानवी अस्तित्वाला भक्ती, समता आणि आंतरिक शांततेच्या एका उच्चतर पातळीवर नेणारा सोहळा आहे.

वारी म्हणजे मानवी अस्तित्वाचा एक पवित्र महासंगम आहे. उंबरेकर म हाराजांच्या दिंडी सोहळ्याकडे पाहताना, एका अशा समाजाचे दर्शन घडते, जिथे अहंकार विरघळतो आणि एकात्मता बहरते. ही पालखी म्हणजे साक्षात एक चालती-बोलती पंढरीच आहे. या दिंडीत शिरताना जो आपल्या पाऊलखुणा मागे सोडतो, तो केवळ एक 'वारकरी' असतो. इथे कोणाच्या क पाळावरचे गंध पाहण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, कारण प्रत्येकाच्या डोळ्यात फक्त विठ्ठलाची ओढ असते. श्रीमंत-गरीब, उच्च-नीच हे सारे भेद माऊलीच्या चरणाशी येऊन शांत होतात. इथे पंक्तीला बसताना 'जात' विचारली जात नाही, तर 'भूक' आणि 'भक्ती' पाहिली जाते. ही पालखी म्हणजे जातीभेद नावाच्या विषवल्लीला उपटून फेकणारी एक सामाजिक क्रांतीच आहे.

उंबरेकर बाबांच्या पालखीची शिस्त ही केवळ चालण्यापुरती मर्यादित न सून ती सामुदायिक एकात्मतेचे प्रतीक आहे. एखाद्या मोठ्या नदीच्या पात्रात जशा अनेक उपनद्या येऊन मिसळतात, तसाच प्रत्येक भक्त आपली वै यक्तिक अस्मिता विसरून समष्टीमध्ये विलीन होतो. टाळांच्या एका ठोक्यावर शेकडो हात हवेत उंचावतात आणि एका सुरात नामघोष होतो, तेव्हा त्या एकजुटीतून निर्माण होणारी ऊर्जा कोणत्याही शस्त्रापेक्षा प्रभावी असते. भक्ती जेव्हा शिस्तीच्या चौकटीत बंदिस्त होते, तेव्हा ती 'साधना' बनते. या दिंडीतील प्रत्येक सेवेकरी—मग तो पाणी देणारा असो किंवा पा लखी खांद्यावर घेणारा—आपल्याला विठ्ठलाच्या सेवेचा एक छोटासा कणा मानतो. ही शिस्त म्हणजे दडपशाही नसून ती एकमेकांबद्दल असलेल्या अफाट आदरातून जन्मलेली संयमपूर्ण अभिव्यक्ती आहे. 'पंढरीचा वास, चंद्रभागेस्नान, आणिक दर्शन विठोबाचे' या इच्छेपोटीच वारकरी हे असीम कष्ट हसत-हसत सोसतात.

### वारी म्हणजे जिथे अहंकार विरघळतो आणि माऊली गवसते....

**आजच्या धकाधकीच्या आणि भौतिक सुखांच्या जगात, जिथे प्रत्येक पावलावर 'नियोजन' आणि 'प्रसिद्धी' यांना महत्त्व दिले जाते, तिथे वारी ही एक अशी विलोभनीय घटना आहे जी साऱ्या जगाला थक्क करते. निसर्गाच्या लहरींना, ऊन-पावसाला तुच्छ मानून वारकरी इतका प्रसन्न आणि टवटवीत कसा राहू शकतो? याचे उत्तर केवळ भक्तीच्या गाभ्यात दडलेले आहे.**

### बंधमुक्त भक्तीचा सोहळा

**या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे इथला निर्भीड आणि निष्कपटपणा. ना कोणाचे कोणावर दडपण आहे, ना कोणत्या प्रलोभनाचा मोह. येथे जात, पात, श्रीमंत-गरीब, उच्च-नीच हे सर्व भेदाभेद गळून पडतात. प्रत्येकाच्या ओठावर एकच नाव आणि मनात एकच ध्यास असतो—तो म्हणजे 'माझी विठुमाऊली'.**

### नियोजनापलीकडचे नियोजन

**सर्वात नवल वाटते ते म्हणजे इथल्या व्यवस्थेचे. खिशात एक रुपया नसताना, उद्याच्या अन्नाची शाश्वती नसताना आणि राहण्याची कोणतीही सोय नसतानाही हा सोहळा इतका शिस्तबद्ध कसा पार पडतो? कोणाच्याही मनात कशाचीही चिंता नाही, कारण सर्वांच्या मनात फक्त विठ्ठलाची ओढ आहे. ही खऱ्या अर्थाने एक अशी 'गर्भश्रीमंती' आहे, जिच्यासमोर कुबेराची संपत्तीही फिकी पडेल. हा मानवी अहंकाराचा लवलेशही नसलेला, मानवी कल्याणाचा आणि ईश्वरी प्रेमाचा हा सर्वात मोठा उत्सव आहे.**

### तृप्तीचा परमोच्च बिंदू

**जेव्हा डोळ्यासमोरून हा वारकऱ्यांचा अथांग महासागर जातो, तेव्हा डोळ्यांचे पारणे फिटते. ऊर भरून येतो आणि मन विठ्ठलमय होऊन जाते. हे दृश्य पाहून जाणवते की, आयुष्यात सुख म्हणजे काय? तर फक्त त्या माऊलीच्या चरणांशी मस्तक टेकवणे.**



निसर्गाच्या सानिध्यात चालणारी ही वारी अधिकच बहरते. आषाढ म हिन्यातील रिमझिम पाऊस आणि मातीचा सुगंध वारकऱ्यांचा उत्साह द्विगुणित करतो. वाटेत गावोगावचे लोक मायेची ऊब देतात; वारकऱ्यांच्या स्वागतासाठी ते सज्ज असतात. वाटेत मिळणारा निवारा, अन्नादान आणि प्रेम, आपुलकी यामुळे वारीत कधीही न भेटलेली माणसे एकमेकांची आयुष्यभराची सोबती बनतात. जमिनीवर झोपणे, मिळेल ते अन्न आनंदाने ग्रहण करणे यातूनच माणसाला साधेपणाचे आणि त्यागाचे महत्त्व कळते.

जेव्हा ही दिंडी पंढरपूरच्या अंतिम टप्प्यात प्रवेश करते, तेव्हा त्या शिस्तीचे रूप अधिकच उठून दिसते. चंद्रभागेच्या तीरी विसावल्यावर सर्व थकवा क्षणात निघून जातो. चंद्रभागेत पवित्र स्नान करून, विठुरायाच्या कळसाचे किंवा चरणांचे दर्शन झाल्यावर वारकऱ्यांच्या डोळ्यांतून वाहणारे आनंदाश्रू या प्रवासाची खरी पावती ठरतात. उंबरेकर बाबांची शिकवण इथेच सार्थ ठरते—अहंकाराचे ओझे टाकून जो वाटेवर चालेल, त्यालाच विठ्ठलाची पायरी जवळची वाटते.

शेव टी, हा पालखी सोहळा म्हणजे एक असा आरसा आहे, ज्यामध्ये संपूर्ण समाज स्वतःचे प्रतिबिंब पाहू शकतो. जिथे भक्तीचा सुगंध दरवळतो, तिथे जातीभेद टिकू शकत नाही आणि जिथे शिस्त असते, तिथे एकात्मता आपोआप फुलते. ही दिंडी केवळ पंढरपूरच्या मंदिराकडे जात नाही, तर ती माणसाच्या हृदयातील संकुचिततेच्या भिंती तोडून, त्याला विशालतेकडे नेणारा एक अखंड प्रवास आहे. उंबरेकर महाराजांच्या भक्तांची ही दिंडी आपल्याला शिकवते की—भक्ती ही केवळ देवाकडे जाण्याची वाट नसून, ती एकमेकांच्या काळजाला स्पर्श करण्याची एक पवित्र कला आहे.

**शब्दांकन विलास ठोंबरे देऊळगाव घाट**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

## वाढदिवस विशेष

# पायाला भिंगरी, मनात समाजाचा ध्यास...

## धनगर आरक्षण लढ्यातील समर्पित चेहरा

# शिवदास बीडगर



**काळ बदलतो, परिस्थिती बदलते, राजकारण बदलते;** पण समाजासाठी निस्वार्थपणे झटणारी माणसे मात्र फार कमी जन्माला येतात. प्रसिद्धी, पद आणि सत्तेच्या पलीकडे जाऊन जे स्वतःचे आयुष्य समाजाच्या प्रश्नांसाठी खर्च करतात, त्यांची ओळख काळाच्या ओघात अधिक ठळक होत जाते. धनगर समाजाच्या आरक्षणासाठी गेली अनेक वर्षे महाराष्ट्रभर सातत्याने संघर्ष करणारे शिवदास बीडगर हे असेच एक समर्पित नाव आहे.

**परळी वैजनाथ तालुक्यातील दाऊतपूर या छोट्याशा गावातून** पुढे आलेला हा तरुण आज राज्यभर धनगर समाजाच्या चळवळीतील विश्वासार्ह चेहरा म्हणून ओळखला जातो. त्याच्या नावामागे मोठी पदे नाहीत, सत्तेची ताकद नाही; पण समाजाचा विश्वास, कार्यकर्त्यांचे प्रेम आणि संघर्षाची शिदोरी आहे. म्हणूनच आज शिवदास बीडगर यांचे नाव घेतले की धनगर आरक्षणाचा लढा डोळ्यांसमोर उभा राहतो.

**विद्यार्थीदशेपासूनच समाजातील प्रश्नांनी त्यांना अस्वस्थ केले.** स्वतःचे भविष्य घडविण्याबरोबरच समाजाचे भविष्य घडविण्याची जबाबदारी त्यांनी स्वतःवर घेतली. अनेक तरुण करिअर, नोकरी आणि स्वतःच्या प्रगतीचा विचार करत असताना शिवदास बीडगर यांनी समाजाच्या लढ्याला प्राधान्य दिले. हा निर्णय सोपा नव्हता, पण त्यांच्यासाठी समाज प्रथम आणि स्वतः नंतर हीच जीवनाची दिशा बनली.

**राजकीय वाटचालीची सुरुवात** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या तालुकाध्यक्ष पदापासून झाली. त्या काळात विविध प्रश्नांवर आंदोलने करत त्यांनी सामान्य नागरिकांचा आवाज बनण्याचा प्रयत्न केला. पुढे तत्कालीन आमदार तथा विद्यमान कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी धनगर समाजाच्या प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे काम केले. परळी तहसील कार्यालयावर काढलेला ऐतिहासिक 'संबळ मोर्चा' त्यांच्या नेतृत्वाला नवी ओळख देणारा ठरला. त्या आंदोलनाने केवळ प्रशासनाचेच नव्हे, तर संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले.

**यानंतर आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या धनगर आरक्षणाच्या राज्यव्यापी चळवळीत त्यांनी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले.** महाडच्या चवदार तळ्यापासून सुरू झालेल्या "धनगर आरक्षणाचा अखेरचा लढा" या आंदोलनात ते सुरुवातीपासून शेवटपर्यंत सक्रिय राहिले. गावागावात जाऊन घोंगडी बैठका घेणे, समाजाशी संवाद साधणे, युवकांना चळवळीत जोडणे आणि आरक्षणाच्या प्रश्नाची माहिती प्रत्येक घरापर्यंत पोहोचविणे हे त्यांचे अखंड काम बनले.

**महाराष्ट्रातील असा कदाचित एखादाच जिल्हा असेल, जिथे शिवदास बीडगर पोहोचले नसतील.** मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकण अशा प्रत्येक भागात त्यांनी समाजजागृतीची मशाल पेटवली. दिवसाचा दिवस प्रवास, रात्री उशिरापर्यंत बैठका, सकाळी पुन्हा दुसऱ्या गावात सभा—हीच त्यांची दिनचर्या झाली. त्यांच्या पायाला भिंगरी लागल्याचे लोक म्हणतात, ते याच कारणामुळे.

**आमदार गोपीचंद पडळकर** यांच्या राज्यभरातील दौऱ्यांचे नियोजन, सभा, कार्यकर्त्यांशी समन्वय आणि आंदोलनाची आखणी यामध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली. पडद्यामागे राहून मोठे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. कोणत्याही कामात शिस्त, वेळेचे नियोजन आणि संघटनशक्ती यामुळे त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये वेगळा विश्वास निर्माण केला आहे.

**मुंबईतील धनगर आरक्षणाच्या विराट मोर्च्याने राज्याचे लक्ष वेधले.** त्या ऐतिहासिक आंदोलनात शिवदास बीडगर यांनी हजारो कार्यकर्त्यांना एकत्र आणण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. या आंदोलनामुळे धनगर समाजाच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने पाहिले. प्रत्येक यशस्वी आंदोलनामागे असंख्य कार्यकर्त्यांची मेहनत असते; त्यामध्ये शिवदास बीडगर यांचे योगदान विशेष महत्त्वाचे राहिले.

**त्यांच्या कार्याची दखल घेत राज्य शासनाने त्यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती केली.** ही नियुक्ती केवळ सन्मान नव्हती, तर त्यांच्या सामाजिक योगदानाची अधिकृत पोचपावती होती. यानंतर शासनाच्या वतीने अहिल्यानगर येथे आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सवाच्या नियोजनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या तयारीपासून विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीपर्यंत त्यांनी जबाबदारीने काम केले. राज्यभरातून आलेल्या समाजबांधवांचे समन्वयन, नियोजन आणि कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यामुळे त्यांच्या संघटन कौशल्याची पुन्हा एकदा राज्यस्तरावर दखल घेतली गेली.

**शिवदास बीडगर यांचे वैशिष्ट्य म्हणजे** त्यांची साधी राहणी आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते. कोणत्याही गावात गेले की ते प्रथम समाजबांधवांच्या समस्या ऐकतात. प्रसिद्धीपेक्षा कामावर विश्वास ठेवणाऱ्या या तरुणाने अनेक युवकांना समाजकारणाची प्रेरणा दिली आहे.

**आज समाजाला अशाच समर्पित नेतृत्वाची गरज आहे.** संघर्षाशिवाय परिवर्तन होत नाही आणि समाजासाठी त्यागाशिवाय इतिहास घडत नाही, हे शिवदास बीडगर यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक दिवस हा समाजासाठी समर्पित आहे. त्यामुळे त्यांचा वाढदिवस हा केवळ वैयक्तिक आनंदाचा दिवस नसून समाजासाठी झटणाऱ्या एका कार्यकर्त्याच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस आहे.











प्रभू वैजनाथ यांच्या चरणी एकच प्रार्थना– शिवदास बीडगर यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेची अखंड ऊर्जा लाभो. त्यांनी पेटवलेली संघर्षाची ज्योत अधिक तेजाने प्रज्वलित राहो. धनगर समाजाच्या न्याय्य हक्कासाठी त्यांनी सुरू केलेली ही वाटचाल यशस्वी होवो आणि त्यांच्या कार्यातून हजारो युवकांना प्रेरणा मिळत राहो.

## वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!



शुभेच्छुक

**नितीन ढाकणे**

संपादक अतुल्य महाराष्ट्र वृत समूह

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
• बीड, सोमवार, 20 जुलै 2026
Last page




# पैसे पासबुक आणि मोबाईल काढून घेतला, तक्रार घेतली जात नाही
## साहेब तक्रार घ्या नाहीतर विष घेईल म्हणत प्राशन केले विष !

**पोलीस सीसीटीव्ही दाखवत नसल्याचा होत आहे आरोप !** | **नेमका संतोष च्या कुटुंबीयांना सीसीटीव्ही का दाखवला जात नाही ?** | **मृत्यूनंतर अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

**काय आहे संतोष सहदेव ढाकणे यांच्या मृत्यूची हकीकत कुटुंबियांनी सांगितलेल्या माहितीनुसार, आरोपीने 50 हजार रुपये व मोबाईल बळजबरीने हिरावल्याचा आरोप**

**नुकताच या संदर्भामध्ये हायकोर्टाने एक नवा आदेश दिलेला आहे ज्यामध्ये 18 महिन्यांपर्यंत सीसीटीव्ही फुटेज जतन करून ठेवावा लागतो**



परळी वैजनाथ / अंबाजोगाई

पैशांसाठी सतत होणारी मारहाण आणि घटनेच्या दिवशी पैसे मोबाईल आणि पासबुक काढून घेतले अस्वलांबा (ता. परळी) येथील २८ वर्षीय तरुण संतोष सहदेव ढाकणे याने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात घटनेच्या नंतर दाखल करण्यात आला गुन्हा पोलीस सीसीटीव्ही दाखवत नसल्याचा कुटुंबियांचा आरोप !

गावातीलच संशयित आरोपी सतीश चंदू कांदे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत संतोषची आई सुरेखा सहदेव ढाकणे (वय ५० वर्षे, रा. अस्वलांबा) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या लेखी फिर्यादीनुसार, ७ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास संतोष घराबाहेर जात असताना, गावातील सतीश चंदू कांदे याने त्याला दुचाकीवर सोबत घेतले. सुरेखा यांनी संतोषला बँकेत भरण्यासाठी ५० हजार रुपये, बँक पासबुक आणि मोबाईल सोबत दिला होता.

### तक्रारीसाठीचा घटनाक्रम, उपचारादरम्यान मृत्यू आणि मोबाईल पासबुक आणि पैसे !

**रुग्णालयात उपचार सुरू असतानाच, १० जुलै २०२६ रोजी रात्री ११:४५ वाजण्याच्या सुमारास संतोषची प्राणज्योत मालवली. धक्कादायक बाब म्हणजे, संतोषच्या मृत्यूनंतर कुटुंबीय घरी परतले असता, त्यांच्या घराच्या खिडकीखाली संतोषचा मोबाईल आढळून आला. घरचे नसताना आरोपी सतीश कांदे याने तो मोबाईल गुपचूप आणून ठेवल्याचा संशय फिर्यादीत व्यक्त करण्यात आला आहे.**




दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास संतोष गंभीर अवस्थेत घरी परतला. सतीश कांदे याने त्याला बेदम मारहाण करून ५० हजार रुपये, बँक पासबुक आणि मोबाईल बळजबरीने काढून घेतल्याचे त्याने आईला सांगितले. "सतीशने माझे जगणे मुश्कील केले आहे, मी आता आत्महत्या करतो," असे म्हणत तो घराबाहेर पडला.

घरच्यांनी त्याला समजावून पोलीस ठाण्यात तक्रार करण्यास सांगितले होते. मात्र,कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार अंबाजोगाई येथे तक्रार करण्यासाठी गेला तक्रार घेत नसल्याचे लक्षात येतं आल्यानंतर संतोषने विषारी कीटकनाशक  प्राशन केले.

विष प्यायलेल्या अवस्थेतच त्याला पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ रुग्णवाहिका बोलावून त्याला उपचारासाठी अंबाजोगाई येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले.

या खळबळजनक घटनेनंतर मयत तरुणाच्या आईच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी सतीश चंदू कांदे (रा. अस्वलांबा) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या कलम १०८ (आत्महत्येस प्रवृत्त करणे), ११५(२) आणि ११४(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस उपनिरीक्षक रहिम बशीर चौधरी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. पोलीस निरीक्षक मुरलीधर रामराव खोकले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

या घटनेमुळे अस्वलांबा परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी होत आहे.

### नेमका सीसीटीव्ही का लपवला जातोय कुटुंबीयांचा आरोप ?

**कुटुंबियांनी वारंवार घटनेच्या दिवशीचा तक्रार करायला आलेल्या संतोष चा सीसीटीव्ही फुटेज दाखवण्याची विनंती केली परंतु कुटुंब यांना कुठल्याच प्रकारची सिस्टी बाबतची माहिती आणि तो दाखवण्यात येत नसल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. नेमकं त्या सीसीटीव्ही मध्ये आहे काय आणि तो काल आपला जातोय असा आरोप कुटुंबियांनी माध्यमांशी माहिती देताना सांगितला.**

---

# सोनम वांगचुक यांना पाठिंबा व शैक्षणिक बेबंदशाही विरुद्ध आज परळीत शैक्षणिक बंद

**शाळा महाविद्यालयांनी सहभागी होण्याचे आवाहन**

**परळी |** गेल्या 20 दिवसापासून दिल्लीतील जंतर-मंतरवर देशातील हजारो विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर उपोषणाला बसलेल्या जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ , शिक्षणप्रेमी व पर्यावरण तज्ञ सोनम वांगचूक यांना पाठिंबा देण्यासाठी परळीतील शिक्षणप्रेमी ,व सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने आज दिनांक 20 जुलै रोजी परळीत जंतरमंतरवर आंदोलन समिती परळीच्या वतीने शैक्षणिक बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

देशातील शिक्षण व्यवस्थेतील बेबंदशाही,सतत नीट, टीईटी आदी परीक्षांचे होणारे पेपर लिक होत असल्यामुळे करोडो विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त होत आहे .शिक्षण व्यवस्थेतील या गैरकारभाराची जबाबदारी घेऊन शिक्षण मंत्री महेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी गेल्या 20 दिवसापासून दिल्लीतील




जंतर-मंतरवर कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचे आंदोलन चालू आहे. या आंदोलनात विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि शिक्षणप्रेमी  व पर्यावरण तज्ञ सोनम वांगचुक उपोषणाला बसले आहेत. सरकारने या आंदोलनाची दखल घेण्याऐवजी लोकशाही पायदळी तुडवीत सोनम वांगचुक यांना पोलिसांनी बळजबरीने उचलून रुग्णालयात दाखल करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे.

केंद्र सरकारच्या निषेधार्थ व सोनम वांगचूक यांना पाठिंबा देण्यासाठी आज परळीकरांनी निदर्शने केली यावेळी महिंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी परळीत शैक्षणिक बंद पुकारण्यात आला आहे.त्यानंतर सकाळी 10.30 वा परळी उपविभागीय कार्यालया मार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात येणार आहे या आंदोलनात परळीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन ॲड. प्रकाश मुंडे, कॉ. पांडुरंग राठोड, जगन्नाथ साळुंखे, ॲड. श्रीनिवास मुंडे, श्याम मुंडे, किरण सावजी, दत्ता दहिवाळ, श्रीकांत पाथरकर, शंकर शेजुळ, शिवाजी देशमुख, सय्यद एस आय, अशोक कांबळे, प्रकाश चव्हाण, रानबा गायकवाड  आदिंनी केले आहे.

---

# राष्ट्रवादी काँग्रेसचे आज धरणे आंदोलन!
## सुरक्षित भवितव्यासाठी विद्यार्थ्यांनी धरणे आंदोलनात बहुसंख्येने सहभागी व्हावे – सतीश शिंदे

**आष्टी प्रतिनिधी |** देशभरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याशी संबंधित प्रश्न, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि करीयर साठी मेहनत घेणाऱ्या प्रत्येक युवकांना न्याय मिळावा या प्रमुख मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आज २० जुलै रोजी बीड येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थी, पालक, युवक आणि सुजाण नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश शिंदे यांनी केले आहे.



शिक्षण व्यवस्था ही देशाच्या भवितव्याचा पाया आहे. मात्र, परीक्षा प्रक्रियेत सातत्याने घडणारे गैरप्रकार, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा खेळ आणि जबाबदार यंत्रणांकडून होणारे दुर्लक्ष यामुळे लाखो विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांच्या कष्टाला न्याय, पारदर्शक परीक्षा व्यवस्था आणि सुरक्षित शैक्षणिक वातावरण मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असून, त्यासाठी लोकशाही मार्गाने आवाज उठविणे ही काळाची गरज आहे.

या धरणे आंदोलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यां कडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार जाणार आहे.

विद्यार्थी आणि युवकांनी आपल्या हक्कांसाठी एकजूट दाखवत शांततापूर्ण आंदोलनात सहभागी व्हावे.

आजचा संघर्ष हा केवळ एका परीक्षेचा नसून, देशातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या सुरक्षित भवितव्याचा आहे. त्यामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि युवकांनी पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन या आंदोलनात बहुसंख्येने सहभागी व्हावे," असे आवाहन सतीश शिंदे यांनी केले.

---

# मालेवाडी तांडा क्र. १ व २ मध्ये व्यसनमुक्तीच्या दिशेने; अवैध दारू निर्मिती व विक्रीवर कायमस्वरूपी बंदीचा निर्धार

**ग्रामसभेत एकमताने ठराव; सरपंच यांच्यासह ग्रामस्थ, महिला व युवकांची व्यसनमुक्त गावासाठी एकजूट**

**परळी वैजनाथ / मालेवाडी | (प्रतिनिधी) :-**

मालेवाडी तांडा क्रमांक १ व २ येथे गावातील अवैध दारूच्या समस्येवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने महत्त्वपूर्ण ग्रामसभा पार पडली. या बैठकीत गावात अवैध दारूची निर्मिती, विक्री व सेवन पूर्णपणे बंद करण्याचा ऐतिहासिक ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत मालेवाडी तांडा क्रमांक १ व २ येथील ग्रामस्थांनी गावात अवैध दारू निर्मिती, विक्री व सेवनाला कायमस्वरूपी आळा घालण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने आयोजित विशेष बैठकीत ग्रामस्थ, महिला, युवक आणि लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. बैठकीस सरपंच करणकुमार पवार, ग्रामपंचायत सदस्य सुदाम भगवान पवार, ग्रामपंचायत सदस्य संजय राठोड, पोलीस पाटील दत्ता डुमणे तसेच तांड्यातील युवक, महिला मंडळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्यसनमुक्त आणि शांततामय गाव घडविण्यासाठी सर्वांनी एकमुखाने पाठिंबा दर्शविला.

यावेळी गावात अवैध दारू तयार करणाऱ्या व विक्री करणाऱ्या संबंधित व्यक्तींना ग्रामस्थांसमोर समज देण्यात आली. गावाच्या हिताचा विचार करून संबंधितांनी यापुढे कोणत्याही प्रकारची



अवैध दारूची निर्मिती अथवा विक्री करणार नसल्याचे जाहीर आश्वासन दिले. बैठकीत भविष्यासाठीही ठोस भूमिका निश्चित करण्यात आली. गावात पुन्हा कोणीही अवैध दारूची निर्मिती, विक्री किंवा साठवण करत असल्याचे आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी ग्रामपंचायत, पोलीस प्रशासन आणि ग्रामस्थ परस्पर सहकार्याने काम करतील, असेही ठरविण्यात आले.

गावातील महिलांनी या निर्णयाचे विशेष स्वागत करत व्यसनमुक्त गाव ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. युवकांनीही सामाजिक बांधिलकी जपत गावातील कोणत्याही अनिष्ट प्रवृत्तीला थारा दिला जाणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला. मालेवाडी तांडा १ व २ येथील ग्रामस्थांनी सामूहिक जबाबदारीची जाणीव ठेवत घेतलेला हा निर्णय सामाजिक एकतेचे आणि जनसहभागाचे उत्तम उदाहरण ठरत आहे. व्यसनमुक्त, सुरक्षित आणि आदर्श गाव उभारण्याच्या दिशेने टाकलेले हे पाऊल इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

परळी वैजनाथ तालुक्यातील मालेवाडी तांडा क्रमांक १ व २ हे व्यसनमुक्त, सुरक्षित आणि आदर्श गाव म्हणून ओळखले जावे, हीच आमची भूमिका आहे. अवैध दारूमुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक नुकसान होत असल्याचे पाहून ग्रामपंचायतीने ग्रामस्थ, महिला व युवकांच्या सहकार्याने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. हा केवळ ठराव नसून संपूर्ण गावाचा सामूहिक संकल्प आहे. यापुढे गावात कोणत्याही प्रकारची अवैध दारूची निर्मिती किंवा विक्री खपवून घेतली जाणार नाही. गावाच्या विकासासाठी आणि भावी पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रत्येक ग्रामस्थाने या निर्णयाला साथ द्यावी, असे आवाहन सरपंच करणकुमार पवार यांनी केले आहे.